# उल्हासनगर महानगरपालिका
## माहिती व जनसंपर्क विभाग

दुरध्वनी क्र. ०२५१-२७२०११६. विस्तार क्र.२२५ proumc321@gmail.com


दिनांक : १०/११/२०२३

# प्रेसनोट

**नागरिकांचे कामे तातडीने व्हावीत व अधिकारांचे विकेंद्रीकरण व्हावे यासाठी सहायक आयुक्त, प्रभाग समिती यांना अधिकार प्रदानाबाबत...**

महाराष्ट्र महानगरपालिका अधिनियमातील कलम २९-अ अन्वये उल्हासनगर महानगरपालिका क्षेत्रात प्रभाग समिती निहाय चार प्रभाग समित्यांची स्थापना करण्यात आलेली आहे. तथापी सद्यस्थितीत उल्हासनगर महानगरपालिकेतील सहायक आयुक्त, प्रभाग समिती यांना अत्यंत मर्यादित स्वरुपाचे म्हणजेच फक्त अनधिकृत बांधकामांविरुध्द कारवाई, फेरीवाला कारवाई, जोखीम आधारीत बांधकाम परवानगी असे अधिकार सोपविण्यात आलेले होते. शहरातील नागरिकांची कामे तातडीने पार पाडावीत, कामकाजाचे विकेंद्रीकरण व्हावे यासाठी सहायक आयुक्त, प्रभाग समिती यांना काही अधिकार प्रदान करणे आवश्यक असल्याचे दिसून आले होते.

नागरिकांची कामे प्रभाग स्तरावर व्हावीत, प्रशासकीय कामात सुलभता यावी यासाठी मा.प्रशासक तथा आयुक्त श्री.अजीज शेख यांनी सहायक आयुक्त, प्रभाग समिती यांचेकडे पुढीलप्रमाणे कामे करणेसाठी अधिकार प्रदान करण्याचा धोरणात्मक निर्णय दिनांक १०/११/२०२३ रोजी घेतलेला आहे.

१. प्रभाग समिती क्षेत्रातील तातडीची दुरुस्ती कामे उदा. गटारांवरील झाकणे बसविणे, नाली दुरुस्ती व इतर किरकोळ दुरुस्ती, जलवाहिन्यांवरील गळत्यांची दुरुस्ती, नळजोडणी दुरुस्ती, पाणी पूरवठा विभागाची तातडीची कामे करणे, भुयारी गटार देखभाल व दुरुस्ती, महापालिका भुखंड/मालमत्ता यांना तात्पुरते कुंपण घालणे, कुंपण दुरुस्ती करणे, समाजमंदिरांची डागडुजी, शौचालय डागडुजी यासाठी सहायक आयुक्त, प्रभाग समिती यांना रु. १.०० लक्ष या मर्यादेपर्यंत खर्च करण्याचे अधिकार.
२. दैनंदिन कचरा वाहतुक व संकलन यावर पर्यवेक्षण करणे, साफसफाईच्या कामाचे पर्यवेक्षण.
३. धोकादायक इमारतींचे महापालिकेच्या पॅनेलवरील संरचनात्मक अभियंता यांचेमार्फत संरचनात्मक परिक्षण करणे व त्यासाठी येणा-या खर्चाची अदायगी करणे.
४. नैसर्गिक व मानवनिर्मित आपात्कालीन परिस्थितीत नागरिकांच्या राहण्याची, जेवण्याची व तदनुषंगिक व्यवस्था करणे यासाठी रु. १.०० लक्ष या मर्यादेपर्यंतचे अधिकार.
५. उद्यान देखभाल व दुरुस्ती यासाठी रु. १.०० लक्ष या मर्यादेपर्यंतचे अधिकार.
६. अवैध नळजोडणी खंडीत करणे, नवीन नळजोडणी मंजुर करणे.
७. प्रभागातील करपात्र मिळकतीचा शोध घेऊन महाराष्ट्र महानगरपालिका अधिनियम व अधिनियमाचे अनुसूची ड प्रकरणी ८ (कराधान नियम) ७ (१) अन्वये कर निर्धारण करणे.
८. महानगरपालिका हद्दीमध्ये प्रदर्शित करणेत येणा-या जाहिराती व आकाशचिन्हे यांना तात्पुरत्या स्वरुपात सात दिवसांच्या कालावधीसाठी जाहिरात परवानगी देणे, परवाना नुतनीकरण करणे, नियमानुसार शुल्क वसूल करणे व तदनुषंगिक कामे करणे.
९. प्रभाग समिती क्षेत्रातील अनधिकृत जाहिरातींवर कारवाई करणे.

या संदर्भात दिनांक १०/११/२०२३ रोजी मा. प्रशासक तथा आयुक्तांनी आदेश पारीत केलेले आहेत.

10/11/23

(छाया प्रकाश डांगळे)
जनसंपर्क अधिकारी
उल्हासनगर महानगरपालिका

प्रत – माहितीस्तव.
मा. प्रशासक तथा आयुक्त, उल्हासनगर महानगरपालिका
प्रत – योग्य त्या कार्यवाहिस्तव रवाना.
१) पत्रकार कक्ष, उल्हासनगर महानगरपालिका
२) सिस्टीम ॲनलिस्ट, माहिती तंत्रज्ञान विभाग, उल्हासनगर महानगरपालिका
- सदरची प्रेस नोट उल्हासनगर महानगरपालिकेच्या संकेतस्थळावर प्रसिध्द करावी.